

डॉ. सुधीर रसाळ

# डॉ. रसाळ यांना 'साहित्य अकादमी'

म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली

विख्यात कवी विंदा करंदीकर यांच्या काव्यशास्त्राची प्रथमच सैद्धांतिक समीक्षा करणाऱ्या 'विंदांचे गद्यरूप' या ग्रंथासाठी ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमीचा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार बुधवारी जाहीर झाला. कोकणी भाषेचा पुरस्कार 'रंगतरंग' या निबंधसंग्रहासाठी मुकेश थळी यांना जाहीर झाला आहे. ताम्रपट, शाल आणि एक लाख रुपये असे स्वरूप असलेल्या या पुरस्कारांचे वितरण आठ मार्च २०२५ रोजी दिल्लीत होणाऱ्या समारंभात करण्यात येईल.




साहित्य अकादमीच्या २०२४च्या पुरस्कारांची घोषणा अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी केली. यंदा गगन गिल यांना हिंदीसाठी, तर इस्टरिन किरे यांना इंग्रजीसाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. बाडला, डोगरी आणि उर्दूमधील पुरस्कार नंतर जाहीर केले जातील, असे त्यांनी सांगितले. यंदा २१ भाषांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, त्यात आठ काव्यसंग्रह, तीन कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, तीन निबंधसंग्रह, 'गद्यरूप विंदा'सह तीन समीक्षात्मक ग्रंथ, एक नाटक आणि एक संशोधनात्मक पुस्तक यांचा समावेश आहे.

उर्वरित मजकूर...II

# डॉ. सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली**

विख्यात कवी विंदा करंदीकर यांच्या काव्यशास्त्राची प्रथमच सैद्धांतिक समीक्षा करणाऱ्या 'विंदांचे गद्यरूप' या ग्रंथासाठी ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमीचा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार बुधवारी जाहीर झाला. कोकणी भाषेचा पुरस्कार 'रंगतरंग' या निबंधसंग्रहासाठी मुकेश थळी यांना जाहीर झाला आहे. ताम्रपट, शाल आणि १ लाख रुपये असे स्वरूप असलेल्या या पुरस्कारांचे वितरण ८ मार्च २०२५ रोजी दिल्लीत होणाऱ्या समारंभात करण्यात येईल.

## 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षा ग्रंथासाठी सन्मान

साहित्य अकादमीच्या २०२४च्या पुरस्कारांची घोषणा अकादमीचे सचिव के. श्रीनिवास राव यांनी केली. यंदा गगन गिल यांना हिंदीसाठी, तर इस्टरिन किरे यांना इंग्रजीसाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. बाडला, डोगरी आणि उर्दूमधील पुरस्कार नंतर जाहीर केले जातील, असे त्यांनी सांगितले.

यंदा २१ भाषांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, त्यात आठ काव्यसंग्रह,



तीन कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, तीन निबंधसंग्रह, 'गद्यरूप विंदा'सह तीन समीक्षात्मक ग्रंथ, एक नाटक आणि एक संशोधनात्मक पुस्तक यांचा समावेश आहे. साहित्य अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी दुपारी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत पुरस्कार विजेत्यांच्या नावांना अंतिम मान्यता देण्यात आली. हे पुरस्कार गेल्या पाच वर्षांत (१ जानेवारी २०१८ ते ३१ डिसेंबर २०२२) या काळात प्रथमच प्रकाशित झालेल्या पुस्तकांना देण्यात आले आहेत. साहित्य अकादमीच्या अक्षरोत्सवात दिल्लीच्या कमानी सभागृहात ८ मार्च २०२५ रोजी आयोजित समारंभात पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम होणार आहे, असेही राव यांनी सांगितले.

मराठीसाठीच्या निवड समितीमध्ये ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके, हरिश्चंद्र थोरात व विद्या देवधर यांचा समावेश होता.